गाव तिथे प्रतिनिधी नेमणे आहे..

दैनिक यश सिध्दी न्यूजसाठी महाराष्ट्रासह सोलापूर जिल्ह्यात गावत तिथे प्रतिनिधी नेमणे आहे. अधिक माहितीसाठी संपर्क : ९९२१९८८३५८

दैनिक
# यश सिद्धि न्यूज

RNI NO. MAHMAR/2023/84162

YASH SIDDHI NEWS

● वर्ष १ ले ● अंक ४७ वा ● सोमवार ०३ जुलै २०२३ ● पाने ४ ● किंमत ४ रु/-

| Volume 1 | Issue 47 | Date : 03/07/2023 | blow : Monday | Page 4 | Price 4


## राष्ट्रवादीत मोठा भूकंप, अजित पवारांनी घेतली उपमुख्यमंत्रीपदाची शपथ



मुंबई : महाराष्ट्राच्या राजकारणात पुन्हा एकदा मोठा भूकंप झाला आहे. राष्ट्रवादीचे नेते आणि विधानसभेचे विरोधी पक्षनेते अजित पवार यांच्या देवगिरी या निवासस्थानी सकाळपासून पक्षातील नेत्यांची बैठक सुरु होती. ही बैठक संपल्यानंतर आता अजित पवार हे राजभवनाकडे रवाना झाले.

राज्याच्या राजकारणात आज मोठी घडामोड पाहायला मिळाली. माजी केंद्रीय मंत्री शरद पवार यांचा पक्ष राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष विघटनाच्या उंबरठ्यावर पोहोचला आहे. काही दिवसांपूर्वीच राष्ट्रवादीचे अजित पवार यांनी विरोधीपक्ष नेतेपदावरून मुक्त करा अशी इच्छा व्यक्त केली होती. आज अजित पवार राष्ट्रवादीच्या ३६ आमदारांसह शिंदे-फडणवीस सरकारमध्ये सामील झाले आहेत.अजित पवार यांनी उपमुख्यमंत्री पदाची शपथ घेतली आहे. त्यांच्याबरोबर छगन भुजबळ, धनंजय मुंडे, हसन मुश्रीफ दिलीप वळसे-पाटील, आदिती तटकरे यांनी सुद्धा मंत्रीपदाची शपथ घेतली आहे.

अजित पवार म्हणाले, आपला एवढा मोठा देश आहे. आता तर जगात सर्वाधिक लोकसंख्या असलेला देश आहे. त्यामुळे देशात मजबूत खंबीर नेतृत्वाची गरज आहे. ती गरज असल्यामुळे आम्ही सर्वांनी अशाप्रकारचा निर्णय घेतला.राज्यात एकनाथ शिंदे व देवेंद्र फडणवीसांचं सरकार काम करत होतं. परंतू मी शुक्रवारी । पान २ वर

**मंत्रीमंडळात सामील झालेल्या नेत्यांची यादी**

अजित पवार -उपमुख्यमंत्री ✻ छगन भुजबळ - मंत्री
दिलीप वळसे-पाटील-मंत्री ✻ हसन मुश्रीफ- मंत्री
धनंजय मुंडे- मंत्री ✻ धर्मारावबाबा आत्राम-मंत्री
आदिती तटकरे- मंत्री ✻ संजय बनसोडे - मंत्री
अनिल पाटील - मंत्री

## आज जिल्हास्तरीय लोकशाही दिन

सोलापूर/प्रतिनिधी : जनतेच्या तक्रारी, गाऱ्हाणी ऐकण्यासाठी जिल्हास्तरीय लोकशाही दिनाचे सोमवार, दिनांक ०३ जुलै २०२३ रोजी सकाळी ११.०० वाजता नवीन जिल्हाधिकारी कार्यालय, महसूल भवन, सात रस्ता, सोलापूर येथे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती निवासी उपजिल्हाधिकारी शमा पवार यांनी दिली.या लोकशाही दिनात मागील महिन्यातील प्रलंबित निवेदन व अर्ज, माहिती अधिकार अधि.-२००५ अंतर्गत प्राप्त अर्ज, आपले सरकार पोर्टलवरील प्रलंबित तक्रारीवर केलेली कार्यवाही याबाबत निपटारा करण्यात येणार आहे. तसेच, नागरिकांच्या लोकशाही दिनातील अर्जावरही कार्यवाही करण्यात येणार असल्याची माहिती श्रीमती पवार यांनी दिली.

## शपथविधी बेकायदेशीर, अजित पवारांसह नऊ जणांवर अपात्रतेची कारवाई होणार; जयंत पाटलांची मोठी घोषणा



मुंबई : राष्ट्रवादीच्या अजित पवार यांच्यासह नऊ जणांची शपथविधी ही बेकायदेशीर असून त्यांना अपात्र ठरवण्याची प्रक्रिया सुरू असल्याची महत्वपूर्ण माहिती राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी दिली. अजित पवार आणि त्यांच्यासोबत गेलेल्या आमदारांची कृती बेकायदेशीर आहे. राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार यांना अंधारात ठेऊन केलेली कृती आहे. एका सदस्याने याची तक्रार केली असून ती शिस्तपालन समितीकडे पाठवण्यात आली आहे.

जयंत पाटील म्हणाले की, आज आम्ही सर्व माहिती घेऊन प्रक्रिया सुरू केली आहे. नऊ जण म्हणजे पक्ष नव्हे. त्यामुळे या नऊ जणांना आता अपात्र ठरवण्याची प्रक्रिया सुरू केली आहे. पक्षविरोधात कारवाई केल्याने या नऊ जणांवर कारवाई करण्यात येणार आहे. पक्षाच्या अध्यक्षाला न सांगता केलेली ही कृती होती. यासंबंधित आता विधानसभा अध्यक्ष राहूल नार्वेकर यांना मेल केला असून त्यांनी आम्हाला लवकरात लवकर बोलवावं. या ९ जणांच्या विरोधातच ही कारवाई असेल. पक्षात असून त्यांनी पक्ष विरोधी कारवाई केली आहे. जयंत पाटील म्हणाले की, जनमत हे पवार साहेबांच्या सोबत आहे. येत्या ५ जुलै रोजी पाहा, पवारा साहेबांच्या पाठिमागे महाराष्ट्र कसा उभा राहतो ते. यातील अनेक आमदार हे परत येणार आहेत. त्यांना आपल्या मतदारांना तोंड कसं दाखवायचं असा प्रश्न पडला आहे. त्यांना या गोष्टीही माहिती नव्हत्या. जे परत येतील त्यांच्यावर कारवाई करणार नाही, पण जे परत येणार नाहीत त्यांच्यावर कारवाई करण्यात येईल.

जयंत पाटील यांनी सर्वोच्च न्यायालयाच्या । पान २ वर

## प्रफुल्ल पटेल आणि सुनिल तटकरे यांनी जबाबदारी पार पाडली नाही, त्यांच्यावर कारवाई करणार; शरद पवारांचा इशारा



मुंबई: अजित पवारांच्या शपवविधीला उपस्थिती राहणं आता राष्ट्रवादीचे नवनियुक्त कार्यकारी अध्यक्ष प्रफुल्ल पटेल यांना भोवणार असल्याचं दिसतंय. प्रफुल्ल पटेल यांची नियुक्ती मी केलीय, त्यांनी त्यांना दिलेली जबाबदारी योग्य पद्धतीने पार पाडली नाही असं सांगत त्यांच्यावर कारवाई करण्यात येईल असं राष्ट्रवादीचे अध्यक्ष शरद पवारांनी सांगितलं. तसेच सुनिल तटकरे यांनीही त्यांची जबाबदारी पार पाडली नाही, त्यांच्यावरही कारवाई केली जाणार असल्याचंही शरद पवारांनी सांगितलं. मी पक्षाचा अध्यक्ष आहे, यापुढे पक्ष वाढवण्यासाठी दौरे करणार असंही ते म्हणाले.

अजित पवारांनी आज शिंदे-भाजपसोबत जाण्याचा निर्णय घेतला असून आज त्यांनी उपमुख्यमंत्रीपदाची शपथही घेतली. अजित पवारांना राष्ट्रवादीच्या ३७ आमदारांचा पाठिंबा असल्याचा दावा केला जात आहे. अजित पवारांच्या आजच्या शपथविधीला राष्ट्रवादीचे कार्यकारी अध्यक्ष प्रफुल्ल पटेल आणि राष्ट्रवादीचे सरचिटणीस सुनिल तटकरे हे उपस्थित होते.। पान २ वर

## संपूर्ण देशात मान्सूनचं आगमन, कोकणसह पश्चिम महाराष्ट्रात ऑरेंज अलर्ट



पुणे : हवामान विभागाने 'गूड न्यूज' दिली आहे. संपूर्ण देशात मान्सूनचं आगमन झाल्याची माहिती हवामान विभागाने दिली आहे. हवामान विभागाने माहिती दिली आहे की, साधारणपणे संपूर्ण भारतात ८ जुलैपर्यंत मान्सून दाखल होतो. पण, यंदा ८ जुलै आधीच संपूर्ण देशात मान्सूनचं आगमन झालं आहे. आता संपूर्ण देशात मान्सून पसरला आहे. भारतीय हवामान विभागाने संपूर्ण देशात मान्सून पसरल्याच रविवारी जाहीर केलं आहे. जुन महिन्यामध्ये १६ राज्य आणि केंद्रशासित प्रदेशांमध्ये तुलनेने कमी पाऊस झाला मात्र, जुलैमध्ये पावसाचा जोर वाढला आहे.भारतीय हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार, देशात सध्या दक्षिण-पश्चिम मान्सून राजस्थान, हरियाणा आणि पंजाबमध्ये पोहोचला आहे. यासोबतच सामान्यपणे देशात मान्सून दाखल होण्याच्या सहा दिवस आधीच मान्सून देशभरात पसरला आहे. आयएमडीने पुढे सांगितलं आहे की, उत्तर प्रदेश आणि दक्षिण बिहार वगळा महाराष्ट्रासह इतर सर्व राज्यांमध्ये जुलै । पान २ वर

## सोलापूरजवळ केके एक्सप्रेसच्या इंजिनला आग; चालकाच्या प्रसंगावधामुळे अनर्थ टळला

सोलापूर/प्रतिनिधी : कर्नाटकातून दिल्लीकडे निघालेल्या के. के. एक्सप्रेसच्या इंजिनमध्ये अचानक पणे विजेचा शार्टसर्किट होऊन आग लागली. ही घटना निदर्शनास येताच रेल्वेचालकाने वेळीच प्रसंगावधान दाखवत गाडी थांबविल्याने पुढील अनर्थ टळला. या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही. मात्र आग विझविण्याच्या प्रयत्नात रेल्वेचालक भाजून जखमी झाला. सोलापूर-कुर्डूवाडी दरम्यान सकाळी मोहोळजवळ ही घटना घडली. बंगळुरू-दिल्ली के. के. एक्सप्रेस (१२६२७) सकाळी सोलापुरात थांबा घेऊन पुढे निघाली. परंतु मोहोळजवळ घाटणे गावच्या परिसरात रेल्वे इंजिनमधून मोठ्या प्रमाणावर धूर निघत असल्याचे रेल्वेचालक विकासकुमार यांच्या लक्षात आले. त्याचवेळी रेल्वे मागाच्या दोन्ही बाजूंकडील शेतात राहणारे काही शेतकरीही धावून आले. रेल्वेचालकाने प्रसंगावधान राखून प्रथम गाडीचा वेग कमी केला आणि गाडी थांबविली. । पान २ वर

## युक्रेन प्रश्नासह द्विपक्षीय सहकार्यावर मोदी-पुतिन चर्चा, ४ जुलै रोजी शांघाय सहकार्य संघटनेची परिषद

नवी दिल्ली : रशियाचे अध्यक्ष व्लादिमिर पुतिन आणि भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शुक्रवारी दूरध्वनीवरून संवाद साधला. यात उभय देशांची धोरणात्मक भागीदारी आणखी मजबूत करण्याविषयी सकारात्मक चर्चा झाली, तसेच युक्रेन पेचावरही विचारविनिमय झाला, असे रशिया सरकारतर्फे सांगण्यात आले.येत्या ४ जुलै रोजी शांघाय सहकार्य संघटनेची (एससीओ) आभासी शिखर परिषद होणार असून त्याचे यजमानपद भारताकडे आहे. त्याआधी पुतिन आणि मोदी यांच्यात ही चर्चा झाली.क्रेमलिनतर्फे सांगण्यात आले की, ही चर्चा सकारात्मक आणि अर्थपूर्ण ठरली. द्विपक्षीय धोरणात्मक संबंध अधिक मजबूत करण्याबरोबरच उभय बाजूने संपर्क वाढविण्यावर चर्चेत भर देण्यात आला. युक्रेनसभोवतालच्या प्रदेशांतील स्थितीवर दोन्ही नेत्यांनी चर्चा केली. विशेष लष्करी क्षेत्रातील सद्यस्थितीची माहिती पुतिन यांनी मोदी यांना दिली. हा पेच राजनैतिक आणि राजकीय चर्चेतून सोडविण्यास युक्रेनने साफ नकार दिला आहे, असे त्यांनी मोदी यांच्या निदर्शनास आणून दिले, असे क्रेमलिनच्या निवेदनात । पान २ वर




दैनिक
# यश सिद्धि न्यूज

सोमवार दि.०३ जुलै २०२३


**✻ सुविचार ✻**

गुलाब देणाऱ्या हातांना त्याचा सुगंध चिकटल्याशिवाय राहात नाही.

## संपादकीय

### हा तर कळीचा मुद्दा असतोच...

बिहारमधील पाटणा या राजधानीच्या शहरात देशातील १५ पक्षांची बैठक झाली. मुख्यत्वे, देशपातळीवर विरोधकांचे ऐक्य व्हावे आणि आगामी लोकसभा निवडणुकीत भारतीय जनता पक्षाला सत्ताभ्रष्ट करण्यासाठी सर्वांनी एकत्र व्हावे, हा या बैठकीचा हेतू होता. या बैठकीत ठोस निर्णय झालेले नसले तरीही आपण सर्वांनी एकत्र यावे, हे तत्त्वतः सर्वांना मंजूर आहे, असे बैठकीनंतर सांगितले गेले. बैठकीत सहभागी होऊनही पत्रकार परिषदेवर बहिष्कार घालणाऱ्या आम आदमी पार्टीच्या अरविंद केजरीवाल यांच्या ूमिकेला संभाव्य विरोधी ऐक्यापेक्षाही जास्ती प्रसिध्दी मिळाली. नितीशकुमार यांच्या पुढाकारातून झालेल्या या बैठकीला राहुल गांधी, शरद पवार, उध्दव ठाकरे, लालूप्रसाद आणि तेजस्वी यादव, ममता बॅनर्जी, अखिलेश यादव, एम. के स्टॅलिन, मेहबूबा मुफ्ती, सीताराम येचुरी, डी. राजा, हेमंत सोरेन, दीपांकर भट्टाचार्य, ओमर अब्दुल्ला असे विविध पंधरा पक्षांचे नेते उपस्थित होते. बैठकीत बहुतांश नेत्यांनी अर्थातच विरोधी ऐक्याची गरज व्यक्त करतानाच आपापले हितसंबंध रेटण्याचा प्रयत्न केला. ही गोष्ट प्रसार माध्यमांमध्येही प्रतिबिंबित झाली आणि त्यातून विरोधकांच्या ऐक्याच्या प्रयत्नाची ही पहिली बैठक फिसकटली नसली तरी आणि प्राथमिक बैठकीनंतर अशा अनेक बैठका होत राहतील, हे निश्चित झाले असले तरीही प्रत्यक्षात ऐक्य होईल का, याविषयी शंकाच वाटते. त्याचे प्रमुख कारण म्हणजे काँग्रेस हा पक्ष खऱ्या अर्थाने राष्ट्रीय पातळीवरील आणि अनेक राज्यात अस्तित्व असलेला पक्ष आहे. त्यामुळे बाकीचे सारे प्रादेशिक पक्ष उदयाला येताना त्यांचा किंवा त्यातील बहुतेक पक्षांचा संघर्ष भारतीय जनता पक्ष किंवा काँग्रेस यांच्याशीच झालेला आहे. लोकसभेच्या निवडणुकांमध्ये भाजपच्या विरोधात एकत्र यायचे आणि विधानसभेला पुन्हा परस्परांविरुध्द शड्डू ठोकायचे, ही गोष्ट मतदारांच्या गळी कशी उतरवणार, हा चिंतेचा मुख्य विषय असतो. त्यामुळे राष्ट्रीय पातळीवर भारतीय जनता पक्षाला पर्याय देण्याचा विचार विरोधकांच्या दृष्टीने स्वागतार्हच आहे. देशातील लोकशाही धोक्यात आली आहे आणि आम्ही लोकशाहीच्या रक्षणासाठी एकत्र आलो आहोत, हा नारा द्यावा लागणार आहे. हे सारे लोक एकत्र आले तरी मुळात देशातील जनतेला देशातील लोकशाही धोक्यात आली आहे, असे वाटत आहे का, हाही कळीचा मुद्दा असतो.

पान १ वरुन

### राष्ट्रवादीत मोठा भूकंप, अजित पवारांनी

विरोधी पक्षनेतेपदाचा राजीनामा दिला होता आणि मागेही मी वर्धापनदिनाच्या निमित्ताने मी माझी स्पष्ट भूमिका मांडली होती, असं अजित पवारांनी सांगितलं. पक्षाची स्थापना झाल्यापासून गेले २४ वर्षे वेगवेगळ्या पद्धतीने पक्ष वाढवण्यासाठी प्रफुल्ल पटेल, छगन भुजबळ आणि सर्वजणांनी शरद पवारांच्या मार्गदर्शनाखाली काम केलं आणि पक्ष इथपर्यंत पोहचला आहे, असंही अजित पवारांनी नमूद केलं.

अजित पवार हे राष्ट्रवादी काँग्रेसच्या प्रदेशाध्यक्ष पदासाठी उत्सुक असल्याचं बोललं जात होतं. त्यासाठी अजित पवार आपल्या समर्थक आमदारांच्या वतीने पक्षावर दबाव टाकत होते, अशीही चर्चा सुरू होती. यानंतर आज अचानक अजित पवार राजभवनावर दाखल झाले आणि त्यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि मंत्रिमंडळातील इतर मंत्र्यांच्या उपस्थितीत उपमुख्यमंत्री पदाची शपथ घेतली. यामुळे राज्याला आता दोन उपमुख्यमंत्री असणार आहेत.

### शपथविधी बेकायदेशीर, अजित ..

निकालाचा दाखला देऊन सांगितलं की, पक्षाने ठरवलेला व्हिप हा अंतिम असतो, आणि जितेंद्र आव्हाड हेच राष्ट्रवादीचे व्हिप असतील. मी त्यांना जो आदेश देईन आणि ते जे सांगतील ते सर्व आमदारांना लागू होईल. ज्या वेळी या नऊ जणांनी शपथ घेतली त्याच वेळी ते अपात्र ठरले असून यासंबंधित पत्र आम्ही निवडणूक आयोगाला दिले असल्याचं जयंत पाटील म्हणाले.

महाराष्ट्रात जे काही सुरू आहे ते तोडफोडीचं राजकारण सुरू आहे, महाराष्ट्रात या आधी असं कधीही झालं नव्हतं. या आधी शिवसेना फोडली, आता राष्ट्रवादीवर हा प्रयोग करण्याचा प्रयत्न केला जात असल्याचा आरोप प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील म्हणाले.

### प्रफुल्ल पटेल आणि सुनिल..

या सर्व घडामोडींवर आता राष्ट्रवादीचे अध्यक्ष शरद पवारांनी प्रतिक्रिया दिली आहे. राष्ट्रवादीचे कार्यकारी अध्यक्ष प्रफुल्ल पटेल यांच्या उपस्थितीवर बोलताना शरद पवार म्हणाले की, मी पक्षाचा राष्ट्रीय अध्यक्ष आहे. पक्ष योग्य पद्धतीने चालावा यासाठी मी प्रफुल्ल पटेल यांची कार्यकारी अध्यक्ष म्हणून नियुक्ती केली होती. पण प्रफुल्ल पटेल यांनी त्यांना दिलेली जबाबदारी योग्य पद्धतीने पार पाडली नाही. त्यामुळे त्यांच्यावर योग्य ती कारवाई केली जाईल.

राष्ट्रवादीचे बडे नेते अजित पवारांसोबत गेले असून त्यांतल्या आठ जणांनी शपथ घेतली. त्यावर प्रतिक्रिया देताना शरद पवार म्हणाले की, एकेकाळी माझ्यासोबत ५६ आमदार होते. त्यापैकी ५० जण मला सोडून गेले. एका क्षणात मी फक्त सहा आमदारांचा नेता झालो. त्यानंतर मी महाराष्ट्राच्या जनतेपर्यंत पोहोचलो, माझी भमिका मांडली. त्यानंतरच्या निवडणुकीत सोडून गेलेल्या ५० पैकी चार ते पाच जणच निवडून आले, बाकी सगळे पडले. आताही मला सोडून गेलेल्यांची मला चिंता नाही. जे सोडून गेलेत त्यांच्या राजकीय भवितव्याची चिंता आहे.

### कोकणसह पश्चिम महाराष्ट्रात ..

महिन्यात मान्सून सक्रिय राहणार आहे. जुलै महिन्यात मान्सून सामान्य राहण्याची अंदाजही हवामान विभागाने वर्तवला आहे.

महाराष्ट्रातही जुलै महिन्यात पावसाचा जोर वाढण्याचा अंदाज हवामान खात्याने व्यक्त केला आहे. महाराष्ट्रातील काही भागांत आज ऑरेंज अलर्ट देण्यात आला आहे.

मुंबई, पुणे, नाशिक कोल्हापूरसह राज्यभरात रविवारी संततधार पाहायला मिळाली. हवामान विभागाने आज कोकण आणि पश्चिम महाराष्ट्रातील काही भागात ऑरेंज अलर्ट जारी केला आहे. यामध्ये रत्नागिरी, सिंधुदुर्ग, सातारा आणि कोल्हापूरला ऑरेंज अलर्ट जारी करण्यात असून या भागात मुसळधार पाऊल पडण्याचा अंदाज आहे. जुलै महिन्याच्या सुरुवातीलपासूनच पावसाचा जोर वाढल्याने सर्वत्र तापमानात गारवा निर्माण झाला आहे. देशभरात सर्वत्र सामान्य तापमान पाच डिग्री सेल्सिअस आणि काही भागात त्याहूनही अधिक खाली घसरलं आहे.

### सोलापूरजवळ केके एक्सप्रेसच्या..

तेव्हा इंजिनमध्ये विजेचे शार्टसर्किट होऊन आग लागल्याचे दिसून आले. ही माहिती रेल्वेचालकाने तात्काळ रेल्वे नियंत्रण कक्षाला कळविली. तेव्हा या मार्गावरून धावणा-या इतर रेल्वेगाड्या नजीकच्या रेल्वे स्थानकांवर थांबविण्यात आल्या. आग लागलेल्या इंजिनच्या पाठीमागे असलेल्या अनारक्षित सर्वसाधारण डब्यातून प्रवाशांना खाली उतरविण्यात आले. त्यासाठी घाठणे गावातील शेतकरी किशोर देशमुख, विश्वास देशमुख, रामचंद्र चव्हाण, गणेश लाळे आदींनी प्रवाशांना डब्यातून सुखरूपपणे बाहेर काढले. त्यामुळे पुढील मोठा अनर्थ टळला.

### युक्रेन प्रश्नासह द्विपक्षीय

म्हटले आहे.हे युद्ध गतवर्षीच्या फेब्रुवारीपासून सुरू आहे. रशियाने युक्रेवर केलेल्या चढाईचा भारताने अद्याप निषेध केलेला नाही. हा प्रश्न चर्चेतून राजनैतिक मार्गाने सोडविला पाहिजे, अशी भारताची दीर्घकाळपासूनची भूमिका आहे.शांघाय सहकार्य संघटना तसेच जी २० परिषदांमधील सहकार्याबाबतही उभय नेत्यांनी संवाद साधला.

## अनुसूचित जाती व नवबौद्ध समाजाच्या घटकांकरिता विविध योजना

राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली संपूर्ण महाराष्ट्रात शासन आपल्या दारी हे अभियान राबविण्यात येत आहे. समाजाच्या तळागाळातील घटकांना शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांचा लाभ मिळावा, हे या अभियानाचे मुख्य उद्दिष्ट आहे. या अनुषंगाने अनुसूचित जाती व नवबौद्ध समाजाच्या घटकांकरिता असलेल्या विविध योजनांबाबत जाणून घेऊया




**मार्जिन मनी योजना :** केंद्र शासनाने २०१५ मध्ये स्टँड अप इंडिया ही योजना घोषित केलेली आहे. या योजनेत अनुसूचित जाती व नवबौद्ध समाजाच्या घटकांकरिता मार्जिन मनी उपलब्ध करुन देण्यात येतो. ८ मार्च २०१९ च्या शासन निर्णयान्वये केंद्र शासनाच्या स्टँड अप योजनेंतर्गत महाराष्ट्र राज्यात सवलती घेण्यास पात्र असलेल्या अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांकरिता नवउद्योजक लाभार्थ्यांना एकूण प्रकल्प किंमतीच्या लाभार्थी यांच्या हिश्यामधील २५ टक्के मधील जास्तीत जास्त १५ टक्के मार्जिन मनी उपलब्ध करुन देण्यात येते. या योजनेच्या मार्गदर्शक सूचना ९ डिसेंबर २०२० आणि २६ मार्च २०२१ नुसार शासनस्तरावरुन निश्चित करण्यात आल्या आहेत. हा शासन निर्णय शासनाच्या ु.ारहरीरीहीर.सेीं.ळप या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आला आहे. स्टँड अप इंडिया योजनेतील सर्व निकषांची पूर्तता करण्याबरोबरच अर्जदाराने मार्जिन मनीतील स्वत:चा १० टक्के हिस्सा भरल्यानंतर व बँकेने अर्जदारास ७५ टक्के कर्ज वितरीत केल्यानंतर जास्तीत जास्त १५ टक्के मार्जिन मनी स्वरुपात संबंधित बँकेस समाजकल्याण आयुक्तांमार्फत उपलब्ध करुन देण्यात येईल.

**भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना :**राज्यातील सामाजिक न्याय विभागांतर्गत शासकीय वसतिगृह प्रवेश न मिळालेल्या अनुसूचित जाती व नवबौद्ध विद्यार्थ्यांसाठी भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना राबविण्यात येते. इयत्ता अकरावी, बारावी आणि बारावी नंतरच्या व्यावसायिक तसेच बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमामध्ये प्रवेश घेतलेल्या अनुसूचित जाती व नवबौद्ध विद्यार्थ्यांना या योजनेचा लाभ देण्यात येतो. या योजनेत भोजन, निवास आणि इतर शैक्षणिक सुविधा या विद्यार्थ्यांना स्वत: उपलब्ध करुन घेण्यासाठी त्यांच्या आधार संलग्न बँक खात्यामध्ये थेट रक्कम या योजनेद्वारे जमा केली जाते.

**भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक विकास योजना :**

अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांच्या वस्त्यांमध्ये पाणीपुरवठा, मलनि:सारण, पाहोचरस्ते, अंतर्गत रस्ते, सार्वजनिक शौचालये, गटारे, समाजमंदिरे, वाचनालय, अभ्यासिका, धम्म केंद्र, विपश्यना केंद्र कामे या योजनेंतर्गत करण्यात येतात.

**कर्मवीर दादासाहेब गायकवाड सबळीकरण व स्वाभिमान योजना :**

अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकातील दारिद्र्य रेषेखालील भूमिहीन शेतमजूर कुटुंबांना उदरनिर्वाहाचे कायमस्वरुपी उत्पन्नाचे साधन उपलब्ध होण्याकरिता त्यांना कसण्याकरिता २ एकर ओलिताखालील जमीन किंवा ४ एकर कोरडवाहू जमीन उपलब्ध जमीन उपलबध करुन देण्यात येते. ही योजना १०० टक्के अनुदान तत्वावर सुरु आहे.

**अनुसूचित जातींच्या मुलां-मुलींसाठी शासकीय निवासी शाळा :**

अनुसूचित जाती व नवबौद्ध मुलां-मुलींकरिता प्रत्येक तालुक्याच्या ठिकाणी एक शासकीय निवासी शाळा सुरु करण्याचा निर्णय घेण्यात आला त्यानुसार इयत्ता पाचवी ते दहावी पर्यंत प्रवेश दिला जातो. सद्यस्थितीत राज्यात एकूण ९० निवासी शाळा कार्यरत आहेत.

**यासेरोद्दीन काझी**, जिल्हा माहिती कार्यालय,उस्मानाबाद.

## बळीराजा तुझ्यासाठी..!

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातील सरकारला एक वर्ष पूर्ण होत असताना आषाढी एकादशी निमित्ताने त्यांनी पांडुरंगाचरणी नतमस्तक होत राज्यातील शेतकऱ्यांसह सर्व घटकांना सुखी, समृद्धी करण्याचे साकडे घातले. बळीराजा संपन्न व्हावा, त्याची संकटे दूर व्हावीत हीच भावना शासनाची असल्याचे त्यातून दिसून आले. मुख्यमंत्री शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात गेल्या वर्षभरात शासनाने तसे निर्णयही घेतले आहेत.

'सततचा पाऊस' ही राज्य शासनामार्फत नैसर्गिक आपत्ती घोषित करुन शेती पिकांच्या नुकसानीकरिता मदत देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. सततच्या पावसाचा दुसरा ट्रीगर लागू झालेल्या महसूल मंडळातील बाधित क्षेत्राचे सर्वेक्षण करुन पंचनामा करण्यात येईल आणि ३३ टक्के पेक्षा जास्त शेती पिकांचे नुकसान झाले असल्यास मदत देण्यात येणार आहे. बाधित शेतकऱ्यांना मदत देण्यासाठी १ हजार ५०० कोटी निधीची तरतूद करण्यात आली आहे.

अतिवृष्टी आणि पूरग्रस्तांना ७ हजार ९३ कोटी १९ लाख रुपयांचे वाटप करण्यात आले. अतिवृष्टी नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना एनडीआरएफच्या मदतीच्या दुप्पट रक्कम आणि दोनऐवजी तीन हेक्टर मर्यादेत मदत देण्याचा निर्णय घेतल्याने शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणात दिलासा मिळाला आहे. 'नमो शेतकरी महासन्मान निधी' योजनेत राज्यातर्फे प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेसाठी पात्र शेतकऱ्यांच्या खात्यावर ६ हजार रुपये जमा करण्यात येणार असल्याने केंद्र आणि राज्याचे मिळून आता शेतकऱ्यांना दरवर्षी १२ हजार रुपये मिळणार आहेत. राज्यातील सुमारे १ कोटीपेक्षा अधिक शेतकरी कुटुंबांना यांचा लाभ होणार आहे.

प्रधानमंत्री पीक विमा योजनेत राज्य शासनाने सुरू असलेल्या खरीप हंगामात केवळ १ रुपये भरुन पीक विम्याचा लाभ देण्याकरिता 'सर्वसमावेशक पीक विमा योजना' राबविण्यास शासनाने मान्यता दिली आहे. नैसर्गिक आपत्ती, किड आणि रोगासारख्या अकल्पित प्रतिकूल परिस्थितीमुळे पिकांचे नुकसान झाल्यास शेतकऱ्यांना विमा संरक्षण देणे. पिकांच्या नुकसानीच्या अत्यंत कठीण परिस्थितीतही शेतकऱ्यांचे आर्थिक स्थैर्य अबाधित राखण्यास त्यामुळे मदत होणार आहे. शेतकऱ्यांच्या पीक विमा हप्त्याचे ३ हजार ३१२ कोटी रुपये सरकार भरणार आहे.

महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजने अंतर्गत नियमित कर्ज परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना प्रोत्साहनपर लाभ देण्यासाठी २०१७-१८, २०१८-१९ आणि २०१९-२० हा कालावधी विचारात घेऊन या तीन आर्थिक वर्षांपैकी कोणत्याही दोन आर्थिक वर्षात पीक कर्जाची उचल करुन नियमित पूर्ण परतफेड केलेल्या शेतकऱ्यांना ५० हजार रुपयांच्या मर्यादेत प्रोत्साहनपर लाभ देण्याचा निर्णय घेण्यात आला. केवळ निर्णयच नाही तर प्रत्यक्षात कार्यवाही करून १२ लाख ८४ हजार शेतकऱ्यांच्या खात्यात ४ हजार ६८३ कोटी रुपयांचे वाटप करण्यात आले.शेतीला दिवसा वीजपुरवठ्यासाठी ३ वर्षांत ३० टक्के कृषि वीजवाहिन्यांचे सौर उर्जीकरण करण्यात येणार आहे. याचा लाभ ९ लाख ५० हजार शेतकऱ्यांना होणार असून शेतीसाठी दिवसा १२ तास वीज उपलब्ध होऊ शकेल. जलयुक्त शिवार अभियानाच्या पहिल्या टप्प्यात २० हजार गावात ६ लाख संरचना तयार होऊन गावे जलयुक्त झाली होती. हे अभियान ५ हजार गावात परत सुरु करण्यात आले आहे. त्यामुळे राज्यातील गावे पुन्हा जलसमृद्ध होण्यास मदत होणार आहे.

सिंचन विकासासाठी जलसंपदा प्रकल्पांना वेग देण्यात येत आहे. आजतागायत २९ प्रकल्पांना सुधारित मान्यता देण्यात आली. त्यामुळे ६ लाख ५० हजार हेक्टर जमीन सिंचीत होणार आहे. शेतजमिनीच्या ताब्यावरून वाद मिटवणारी सलोखा योजनादेखील सुरू करण्यात आली आहे. आंतरराष्ट्रीय भरडधान्य वर्षानिमित्त 'श्रीअन्न अभियान' अंतर्गत २०० कोटी रुपयांची आर्थिक तरतूद करण्यात आली आहे.शेतीसाठी शासनाने घेतलेल्या या गतीमान निर्णयांमुळे शेतकऱ्यांना संकटकाळात दिलासा मिळण्यासोबत शेतीचे उत्पादन वाढवून आर्थिक स्थैर्यासाठीदेखील मदत होणार आहे. वर्षभरातील या सकारात्मक आणि क्रांतीकारी निर्णयांमुळे शेती आणि शेतकऱ्यांच्या जीवनात समृद्धी येऊ शकेल. **जिल्हा माहिती कार्यालय पुणे**

## टीचभर पोटाची खळगी भरण्यासाठी पोतराज अंगावर आसूडाचे फटके ओढत फिरतो आहे

एकविसावे शतक, विज्ञानाचे शतक म्हणतो या डिजिटल जगात मरीआई चा पोतराज टीचभर पोटाची खळगी भरण्यासाठी अंगावर आसूड मारुन घेत दारोदारी भिक मागत जीवन जगत आहे. याला शिक्षण, नाही, स्वतःचे घर नाही, बँकेत त्याचे खाते नाही,भविष्याची कसलीही तरतूद नाही त्याचे आयुष्य असे भीक मागून खाण्यात जात आहे. याची पुढची पिढी ही याच वाटेवर आहे असे भटके विमुक्त जाती जमातीचे अनेक लोक महाराष्ट्रात व देशात आहेत त्यांचा प्रश्न आज तसाच आहे. किती सरकारे आली आणि गेली पण यांच्या जीवनात काहीच फरक पडलेला नाही. आपला देश महासत्ता बनण्याच्या दिशेने जात आहे असे म्हटले जाते त्यात याचा कुठे अंतर्भाव दिसत नाही. विकास या विषयावर टीव्ही वर वर्तमान पत्रातून चर्चा होते पण या विकासाकडे या पोतराजाने पाठ फिरवली आहे की राज्यकर्त्यांनी पाठ फिरवली हा संशोधनाचा भाग आहे. आज असाच एक पोतराज अंगावर आसूड ओढत भीक मागत नळदुर्ग येथे आठवडी बाजारात प्रत्येक दुकानावर जाऊन एक एक रुपयाची मागणी करत आहे कोणी भीक देते तर कोणी पुढे जा असे म्हणतात.पोतराजाची पत्नी त्याच्या मागे वाद्य वाजवते व तो उघड्या अंगावर आसूड मारत भीक मागत आहे हे मनाला वेदना देणारे दृष्य पाहून मला प्रश्न पडला की खरेच आपला देश महासत्ता होणार आहे का? आज ही भारत भूक भागविण्याची क्षमता निर्माण केली नाही का जगात आपण भूक मुक्ति मध्ये अन्य




देशाच्या तुलनेत १२९ व्या स्थानी आहोत असे समजते ही अत्यंत चिंतनीय बाब आहे आज जी अनेक जात समूहाचे लोक विकासापासून कोसो दूर आहेत. त्यांच्या जीवनमानात सुधारणा करणे आवश्यक आहे. भांवलशाही देशात वाढताना दिसत आहे भांडवलशाही चा प्रभाव वाढला तर लोकशाहीचे अस्तित्व धोक्यात येणार आहे. आपला देश जगातील अति श्रीमंत लोक असलेला देश आहे पण अति श्रीमंत लोकांचा दरिद्री देश असे म्हणण्याची वेळ आली आहे यातून बाहेर पडण्यासाठी योग्य ती उपाय योजना करावी लागेल असे मला वाटते

**मारुती बनसोडे, सचिव,परिवर्तन सामाजिक संस्था नळदुर्ग ९५९५१७१८६६**

## कल्याणशेट्टी शिक्षण संकुलात विठ्ठल नामाच्या गजरात निघाला पालखी सोहळा




अक्कलकोट/प्रतिनिधीः अक्कलकोट येथील महर्षि विवेकानंद समाजकल्याण संस्थेचे सौ. सुरेखा कल्याणशेट्टी मराठी व सेमी इंग्रजी माध्यमिक विद्यालय व ज्युनियर कॉलेज, मातोश्री गुरुबसव्वा कल्याणशेट्टी कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, गिरीजामाता प्राथमिक मराठी व सेमी इंग्रजी विद्यालय, नालंदा विद्यार्थी वसतीगृह यांच्या वतीने आषाढी एकादशी निमित्त संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम व संत शेगाव गजानन महाराज यांचा पालखी सोहळा मोठ्या उत्साहात संपन्न झाला

यावेळी मूर्ती, ग्रंथ व पालखी पुजन संस्थेच्या संचालिका सौ शांभवी कल्याणशेट्टी, सीईओ सौ रूपाली शहा, ज्युनियर विभाग प्रमुख सौ पुनम कोकळगी व प्राचार्य मलकप्पा भरमशेट्टी यांच्या शुभहस्ते करण्यात आले. याप्रसंगी विठ्ठल-रुक्मिणी, संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम,संत नामदेव, संत मुक्ताई, जनाई, संत मीराबाई व वारकऱ्यांची वेशभूषा करून टाळ मृदंगाच्या तालात नाचत गाजत विठ्ठल नामाचा गजर करत पुष्पवृष्टी करत मोठया उत्साहात दिंडी काढण्यात आली. संतज्ञानेश्वर, संत तुकाराम व संत गजानन महाराज यांच्या पालख्या तीन ठिकाणाहून एकत्र आल्यानंतर शाळेच्या आवारात मोठे रिंगण तयार करण्यात आले. यावेळी मुलानी पांढरा नेहरूशर्ट विजार व मुलीनी नऊवारी साडी परिधान केले होते. या

रिंगण सोहळ्यात विद्यार्थ्यांनी, शिक्षकांनी व संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी टाळ मृदंगाच्या तालात, पाऊले टाकीत, फुगड्या घालीत या सोहळ्याचा आनंद लुटला. हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी सांस्कृतिक विभाग प्रमुख खंडेराव घाटगे, कुमार जाधव, निशिगंधा कोळी, सलोनी शहा, पूजा कडबगावकर, सुरेश रुग्गे यांनी विशेष प्रयत्न केले. यावेळी प्राथमिकचे मुख्याध्यापक सुरेश आवटे ,निखिल भालेराव, प्रकाश पाटील,शिक्षक, कर्मचारी,पालक व विदयार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी, मुद्रक, प्रकाशक, संपादक, कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन्स अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार , रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु.पो. गोगांव ता. अक्कलकोट जि सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे email ; yashsiddhinewsgmail.com www.yashsiddhinews.com mo: 9921988358

This newspaper is printed by the Owner , Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor, Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur 413002 [Maharashtra], Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 [Maharashtra]. Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

# वटवृक्ष देवस्थान कार्याचा उल्लेख सिंबायोसिसच्या माध्यमातून आंतरराष्ट्रीय माध्यमांपर्यंत पोहोचवू : डॉ.संतोष आघाव

अक्कलकोट/प्रतिनिधीः अनंत कोटी ब्रम्हांडनायक स्वामी समर्थ हे संपूर्ण विश्वाचे गुरु आहेत, त्यामुळे त्यांच्या जीवनकार्याचा उल्लेख भाविकांपर्यंत जागतिक पातळीवर आहेच. परंतु स्वामी समर्थांची सेवाभाव ही प्रवृत्ती देवस्थान विश्वस्त समितीने जोपासून आलेल्या सर्व भाविकांची सेवा महेश इंगळे व विश्वस्त समिती सदस्य करीत आहेत त्यामुळे वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थान विश्वस्त समितीच्या या उत्कृष्ट सेवाभाव कार्याचा उल्लेख आपण सिंबायोसिस विद्यापीठाच्या माध्यमातून आंतरराष्ट्रीय माध्यमांपर्यंत पोहोचवू असे प्रतिपादन सिंबायोसिस आंतरराष्ट्रीय विद्यापीठ संचलित हैद्राबाद येथील सिंबायोसिस लॉ स्कूलचे संचालक डॉ.संतोष आघाव यांनी व्यक्त केले. ते नुकतेच येथील श्री वटवृक्ष स्वामी महाराज मंदिरास भेट देऊन श्री स्वामी समर्थांचे दर्शन घेतले. या प्रसंगी मंदिर समितीच्या वतीने समितीचे चेअरमन व नगरसेवक महेश इंगळे यांनी संतोष आघाव दाम्पत्याचा श्री स्वामी समर्थांचे कृपावस्त्र, प्रसाद, प्रतिमा देऊन यथोचित सन्मान केला. याप्रसंगी आघाव बोलत होते. पुढे बोलताना आघाव यांनी मंदिर समितीच्या कार्याचा स्तर हा उच्च दर्जाचा असून आंतरराष्ट्रीय स्तरावर या कार्याची नोंद नक्कीच घेतली जाईल असेही मनोगत व्यक्त करून श्री वटवृक्ष महाराज देवस्थान कार्यास व महेश इंगळे यांच्या वाटचालीस शुभेच्छा व्यक्त केल्या. यावेळी मंदिर समितीचे सचिव आत्माराम घाटगे, विश्वस्त महेश गोगी, श्रीशैल गवंडी, मनोज कामनुरकर, गिरीश पवार, प्रसाद सोनार, संजय पवार, श्रीकांत मलवे, विपुल जाधव, इत्यादी उपस्थित होते.



# मराठा समाजाला आरक्षण मिळवुन देणे हीच खरी दिवंगत विनायक मेटे यांना श्रध्दांजली ठरेल : केंद्रीय मंत्री ना.रामदास आठवले




मुंबई : मराठा समाजाला आरक्षण मिळवुन देणे हीच खरी दिवंगत नेते विनायक मेटे यांना श्रध्दांजली ठरेल. मराठा समाजाला आरक्षण देण्यासाठी शिवसंग्रामप्रमुख नेते दिवंगत विनायक मेटे हे शेवटच्या श्वासापर्यंत लढले होते. मराठा समाजातील गरीबांना आरक्षण मिळवुन देण्यासाठी माझा रिपब्लिकन पक्ष सदैव मराठा आरक्षणाच्या लढयात आपल्या सोबत असल्याचे प्रतिपादन रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री ना. रामदास आठवले यांनी केले. यावेळी दिवंगत विनायक मेटे यांच्या पत्नी डाँ. ज्योती मेटे, रिपब्लिकन पक्षाचे युवक आघाडीचे महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष पप्पु कागदे आदि मान्यवर उपस्थित होते. बीड येथे दिवंगत विनायक मेटे यांच्या जयंती निमीत्त आयोजित जाहीर अभिवादन सभेत ते बोलत होते. सभेपुर्वी दिवंगत विनायक मेटे यांच्या स्मृतीस्थळी जावुन पुष्पांजली अर्पण केली. मराठा आरक्षण आहे गाठीशी मग मी का राहणार नाही तुमच्या पाठीशी असे सांगत ना. रामदास आठवले यांनी मराठा आरक्षणाच्या लढयाला आपला पाठिंबा असल्याचे सांगितले आहे. दिवंगत विनायक मेटे यांच्याशी आपले जवळचे संबंध होते. दिवंगत विनायक मेटे यांनी विधानभवनात वेळोवेळी मराठा आरक्षणाचा मुद्दा उपस्थित केला. राज्यभर त्यांनी मराठा समाजासाठी मोठे काम केले आहे. रिपब्लिकन पक्षानेही मराठा समाजाच्या आरक्षणाच्या लढयात सदैव मराठा समाजाला साथ दिली. मराठा समाजातील गरीबांना आरक्षण मिळाले पाहिजे यासाठी रिपब्लिकन पक्षाच्या नेवृत्वात दलित बहुजन समाजानेही मराठा आरक्षणाच्या आंदोलनात साथ दिली. असे ना. रामदास आठवले यावेळी म्हणाले.

# भैरवनाथ कानडे लिखित 'नोबेल विजेते भारतीय' पुस्तकाचे प्रकाशन

वागदरी/एस.के.गायकवाड : महाराष्ट्र शासन सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाअंतर्गत जिल्हा समाज कल्याण अधिकारी जिल्हा परिषद धाराशिव , सहाय्यक आयुक्त समाज कल्याण व उपायुक्त जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती , धाराशिव यांच्या वतीने घेण्यात आलेल्या राजर्षी शाहू महाराज जयंती व सामाजिक न्याय दिनाचे औचित्य साधून धाराशिव येथील मुख्य कार्यक्रमात ( दि २६ ) रोजी चिकुंद्रा ता . तुळजापूर येथील पत्रकार तथा सहशिक्षक भैरवनाथ कानडे यांच्या 'नोबेल विजेते भारतीय ' या पुस्तकाचे मान्यवरांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले.

धाराशिव शहरातील डॉ . बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन सभागृहात संपन्न झालेल्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिल्हा जात पडताळणी समिती उपायुक्त बलभीम शिंदे हे होते सदर कार्यक्रमास जिल्हा परिषदेचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी तथा जिल्हा समाज कल्याण अधिकारी सूर्यकांत भुजबळ , प्रमुख




व्याख्याते म्हणून भैरवनाथ कानडे , या शिवाय समाज कल्याण सहाय्यक आयुक्त बाबासाहेब अरवत , डॉ . संदीप तांबारे नशाबंदी मंडळाचे जिल्हा समन्वयक मारुती बनसोडे ,शंकर खुणे , पद्मिनी वाघमारे , नवनाथ उपळेकर आदींची प्रमुख उपस्थिती होती.

प्रारंभी राजर्षी शाहू महाराजांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून दीपप्रज्वलन करण्यात आले .या प्रसंगी 'राजर्षी शाहू महाराजांचे जीवन व कार्य ' या विषयावर व्याख्याते भैरवनाथ कानडे यांनी विचार मांडले . अध्यक्षीय समारोपात बलभीम शिंदे यांनी तर नशाबंदी मंडळाचे डॉ .संदीप तांबारे, मारुती बनसोडे आदींनी विचार व्यक्त केले .

या कार्यक्रमास युवराज भोसले ,अतुल जगताप , समाज कल्याण निरीक्षक अमोल कांतगळे ,बिभीषण शिरसाट ,कपिल थोरात , युवराज चव्हाण ,राम गुरव , संकेत भोसले ,संकेत जगताप ,विकास राठोड , रमेश वाघमारे आदीसह सामाजिक न्याय विभागातील विविध पुरस्कार प्राप्त व्यक्ती विद्यार्थी , शिक्षक व नागरिक यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती

# टाकळीवाडी येथे प्रशासकीय अधिकाऱ्यांचा संयुक्त कार्यक्रम संपन्न

पत्रकार नामदेव निर्मळे

टाकळीवाडी तालुका शिरोळ येथील आज ग्रामपंचायत टाकळीवाडी येथे १५ वर्षाच्या प्रदीर्घ सेवेनंतर कर्तव्यदक्ष ग्रामसेवक आमचे सन्माननीय मित्र श्री.एन.एच.मुल्ला साहेब यांची सेवा बदली निमित्त निरोप समारंभ संपन्न झाला.

अतिशय भावनिक वातावरणात सदर कार्यक्रम पार पडला.त्याच वेळी मंडळ अधिकारी श्री. विनायक माने साहेब , गावकामगार तलाठी श्री. महेश साळवी साहेब व कृषी सहायक श्री. जयपाल बेरड साहेब यांचा देखील सेवा बदली निमित्त निरोप समारंभ आयोजित करण्यात आला. एक अत्यंत भावनिक सोहळा पार पडला. त्याचबरोबर नव्याने रुजू होणाऱ्या ग्रामसेविका अनघा सावगावे मॅडम , कृषी सहायक वैदही पाटील मॅडम व गावकामगर तलाठी श्री.अजय नाईक साहेब यांचा स्वागत समारंभ देखील घेणेत आला. बदली होवून जाणारे अधिकारी व नव्याने येणारे अधिकारी असा संगम यानिमित्ताने सर्वांना पाहायला



मिळाला.याप्रसंगी विद्यमान सरपंच सौ.मंगल बिरणगे, परिवर्तन आघाडी चे सर्व नेते , कार्यकर्ते , माजी सैनिक संघटने चे पदाधिकारी, विविध संस्थांचे पदाधिकारी, प्रगतशील शेतकरी, ग्रामपंचायती चा सर्व स्टाफ व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# आषाढी एकादशीनिमित्त ननवरे यांच्याकडून भाविकांना फराळाचे वाटप

पंढरपूर/प्रतिनिधीः जनसेवा हीच ईश्वर सेवा हे ब्रीद वाक्य अनेक नागरिकांना ज्ञात आहे पालखी मार्ग आणि संतांच्या दिंड्यांना खाऊ पिऊ घालण्याचे अनेक नागरिक पुढे येऊ ला लागले आषाढी एकादशी दिवशी आहेत पंढरपूर मधील लाखो भावी येत असतात येणाऱ्या भावी भक्तांना दिवसभर खिचडी वाटपा करण्यात येत होते संजय ननवरे यांनी हजारो भाविकांना खिचडीचा स्वाद देण्यात आला एकादशी निमित्त प्रशासन देखील अधिकारी आणि कर्मचारी भाविकांच्या सेवेत झोपून देतात भाविकांना फराळ व इतर खाद्यपदार्थ वाटप करण्यात अनेक दानशूर व्यक्ती काम करीत असतात. पंढरपूर मधील समाजसेवक व गोरगरिबाचे कायम मदत करणारे प्लीज संजय बाबा ननवरे हे दानशूर प्रसिद्ध आहेत आषाढी एकादशी निमित्त शाबू खिचडी व इतर पदार्थ श्याम यांना उभा करून खिचडी वाटप



सुरू करण्यात आले संजय ननवरे यांची कार्यकर्ते व त्यांचे चाहते या भाविकांना दिवसभर खिचडी वाटप करण्यास मदत केली भाविकांनी खिचडीचा महाप्रसाद घेऊन विठ्ठलाचे नामकरण करण्यात आले

# सुब्रतो कप आंतरराष्ट्रीय फुटबॉल क्रीडा स्पर्धेसाठी १४ जुलैपर्यंत प्रवेशिका पाठवण्याचे आवाहन

सोलापूर/प्रतिनिधीः दिनांक १४ सप्टेंबर ते २३ ऑक्टोबर २०२३ या कालावधीत ६२ व्या आंतरराष्ट्रीय सुब्रोतो कप फुटबॉल (सबज्युनिअर / ज्युनिअर) क्रीडा स्पर्धा सन २०२३ चे आयोजन करण्यात येत असून, या राष्ट्रीय स्पर्धेच्या प्रवेशिका दिनांक १४ जुलै पर्यंत क्रीडा अधिकारी कार्यालय कुमठा नाका सोलापूर येथे कार्यालयीन वेळेत जमा करण्याचे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी नरेंद्र पवार यांनी पत्रकाद्वारे केले आहे.

पत्रकात म्हटले आहे,क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे अंतर्गत जिल्हा क्रीडा अधिकारी व जिल्हा क्रीडा परिषद सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित सुब्रोतो मुखर्जी स्पोटर्स एज्युकेशन सोसायटी, नवी दिल्ली व्दारा सन २०२३-२४ या वर्षात ६२ वी आंतरराष्ट्रीय सुब्रोतो कप फुटबॉल (सबज्युनिअर / ज्युनिअर) क्रीडा स्पर्धा सन २०२३ चे आयोजन करण्यात येणार आहे. सदर राष्ट्रीय स्पर्धा दिनांक १४ सप्टेंबर ते २३ ऑक्टोबर २०२३ या कालावधीत १४ वर्षाखालील मुले (सबज्युनिअर ) या वयोगटाच्या स्पर्धा बंगळूर या ठिकाणी होणार आहेत व १७ वर्षाखालील मुले / मुली (ज्युनिअर) या वयोगटाच्या स्पर्धा दिल्ली येथे आयोजित होणार आहेत.


सदर स्पर्धेत सहभागी होणाऱ्या खेळाडूंसाठी जन्म तारखेनुसार वयोमर्यादा पुढील प्रमाणे आहे. वयोगट -१४ वर्षाखालील मुले (सबज्युनिअर) दिनांक ०१ जानेवारी २०१० रोजी किंवा त्यानंतर जन्मलेला असावा.१७ वर्षाखालील मुले/मुली (ज्यूनिअर) दिनांक ०१ जानेवारी २००७ रोजी किंवा त्यानंतर जन्मलेला असावा. जिल्हास्तर सुब्रोतो फुटबॉल कप क्रीडा स्पर्धाचा कार्यक्रम खालील प्रमाणे - वयोगट -१४ वर्ष मुले व १७ वर्ष मुली- स्पर्धा कालावधी - दिनांक १८ ते १९ जुलै २०२३. - १७ वर्षे मुले- दिनांक १९ ते २० जुलै २०२३स्पर्धा उपस्थिती - दिनांक १८.०७.२०२३ रोजी सकाळी ९.०० वा -१४ मुले व १७ मुली . स्पर्धा उपस्थिती - दिनांक १९.०७.२०२३ रोजी सकाळी ९.०० वा.- १७ वर्षे मुले. स्पर्धा स्थळ- शासकीय मैदान नेहरु नगर विजापूर रोड सोलापूर.संपर्क क्रमांक- श्री. गणेश पवार राज्य क्रीडा मार्गदर्शक मो.नं ९९७००९५३१५ श्री. किरण दुस्तकर मो.नं ८७८८१९२१२४ संघटना प्रतिनिधी . तरी या कार्यक्रमानुसार सोलापूर जिल्ह्यातील सर्व शाळा/ महाविद्यालये मुख्याध्यापक व क्रीडा शिक्षक यांनी आपल्या शाळेचे संघ निवड करुन सुब्रोतो मुखर्जी फुटबॉल कप क्रीडा स्पर्धेमध्ये सहभागी होण्याकरिता www.subrotocup.in या संकेत स्थळावर खेळाडू व संघाची नोंदणी करणे अनिवार्य आहे.



# इब्राहिमपूर मराठी शाळेत विठ्ठल नामाची शाळा भरली

अक्कलकोट/प्रतिनिधीः इब्राहिमपूर येथील मराठी शाळेत आषाढी एकादशी निमित्ताने विठ्ठल नामाची शाळा भरली. प्रारंभी शाळेच्या मैदानात विठल्लाच्या पालखीचे पूजन श्री महेश बबलाद व फोटो पूजन बाबुराव भोसगे यांनी केले. पालखी सोहळ्यात मुसलमान बांधवांनी सुध्दा उपस्थिती लावली. धार्मिक समन्वय साधून आषाढी एकादशी साजरा करण्यात आला.कर्यक्रम यशस्वी करण्यासाठी शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष श्री संजय रेवूर शिक्षणप्रेमी- महेश बबलाद व सिध्दाराम बबलाद जयभीम गायकवाड मौला शेख धनाजी वाघमारे, लवटे मॅडम यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे शेवट शाळेचे मुख्याध्यापक श्री रमेश सिध्दण्णा जमादार यांनी सर्वांचे आभार मानले

## शब्दकोडे क्र ४७



आडवे शब्द १. धृतराष्ट्राला महाभारत युद्धाचे वर्णन सांगणारा ३. अतिशय अशक्त व्यक्ती, खूप लुकडा ६. मनाविरुद्ध ११. पालेभाजीची गड्डी १२. कळस १३. फजिती १४. कौशल्यपूर्वक, सहजगत्या १६. हाताने चालवण्याचे कापड बनवणारे यंत्र १८. शिवीगाळ १९. हात २०. सुट्टीचा वार २३. गर्दी २४. वधू २५. दोस्त २६. लग्नकार्यातील देणेघेणे २७. खिजगणतीत नसलेले २८. शुभारंभ ३०. गेरू ३०अ. प्रवास ३३. जिवाचा सखा (ग्रामीण) ३४. स्वच्छ ३५. युद्धबंदी ३६. पाण्यातील सजीव ३७. वाळवलेला आवळा ३९. एक लवचिक पदार्थ ४१. डोके ४३. सीता ४५. ठोंब्या ४६. स्पष्ट ४८. रक्तवाहिनी ४९. ख्याती ५१. देह ५२. कुबेराचा सेवक ५३. वैर ५४. महाभारतात गंगेच्या पोटी जन्म घेणारे आठ ऋषी ५५. लहान, छोटेखानी (इंग्रजी) ५६. चाक ५७. शेतातील पिकाचा उरलासुरला गाळसाळ ६०. कवितेच्या ओळीतील शेवटची अक्षरे जुळून येणे ६२. न मागता मिळालेले ६३. कसरत, सराव ६६. दुखापत ६७. निर्दालन ६८. तरतूद ७०. दिमाख ७२. शस्त्र ७३. नवरदेव ७५. व्यर्थ ७६. वणवा ८०. हार, मालिका ८१. खटाटोप ८३. वर्तुळ ८४. निश्चेष्ट ८६. अंधार ८७. भीतीने उडालेली गाळण ८९. शेखी ९०. नमुना ९१. विलंब, अडचण ९२. ज्वारीचा कणीस कापलेला खुंट, आचळ ९३. लढाई

उभे शब्द २. 'एक धागा सुखाचा, शंभर धागे दुःखाचे...' ३. वासरू (स्त्री लिंगी) ४. शिष्य ५. तजेलदार ६. शिखर ७. ग्राहकाला लुबाडून नफा मिळवण्याची वृत्ती ८. गाडीचे छत ९. वाटचाल करणे १०. असंमती ११. जुने जीर्ण वस्त्र १२. वस्त्र विणण्याचे साधन १५. मत्सर १७. हिंदूंचा अकरावा महिना १८. स्त्रीचे सौंदर्य २१. प्रचंड २२. शान, तेज २४. गाव २५. यज्ञ २६. गगन २७. आदराने मस्तक झुकवलेला २८. नारळ २९. विज्ञान ३०अ. उत्सुकता अनावर झालेला ३१. दृष्टी ३२. सूड ३४. हळू, संथ गतीने ३८. तिरळा ४०. अधिक बलवान ४२. आक्रमण ४४. अचंबित ४६. चुट्टा ४७. केविलवाणी अवस्था ५०. पिठूळ पदार्थ (उदा. बटाटे, रताळी, इ.) ५१. फूल ५६. गारगोटीचा दगड ५७. नित्य ५८. बोलबच्चन ५९. द्द्यापासून बनवलेले पाचक पेय ६१. माज ६४. बोलणे ६५. कन्या ६६. हेतू ६९. निकट ७१. अग्नी ७४. नाला ७५. वादग्रस्त प्रकरणी तोडगा काढण्यासाठीची चर्चा ७७. मोठा पतंग, अफवा ७८. ठोक्यात ७९. कुशल ८०. विचार, बेत ८१. लालूच ८२. श्रेष्ठ ८४. आठ ८५. फिकीर ८८. मवाली

# हन्नूर च्या अनंत चैतन्य प्रशालेने साजरा केला विठुमाऊलीचा दिंडी सोहळा

अक्कलकोट/प्रतिनिधी : आषाढी एकादशी च्या निमित्ताने महाराष्ट्राचे कुलदैवत श्रीक्षेत्र पंढरपूर च्या पांडुरंगाची पालखी व दिंडी महर्षि विवेकानंद समाजकल्याण संस्था अक्कलकोट संचलित अनंत चैतन्य माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, सेमी इंग्लिश प्राथमिक




विद्यालय हन्नूर च्या वतीने बुधवार दिनांक २८ जुन २३ रोजी हन्नूर गावातून काढण्यात आली. प्रारंभी प्रशालेचे पर्यवेक्षक श्री.अशोक साखरे सर यांच्या हस्तेश्री विठ्ठल रुक्मिणीं मातेचीपुजा व आरती केल्यानंतर बोला पुंडलिक वरदाहारी विठ्ठल श्री ज्ञानदेव तुकाराम, भगवान पंढरीनाथ महाराज की जय,अशा हरिनामाच्या जयघोषात अत्यंत भक्तिमय अशा वातावरणात ,टाळमृदुंगाच्या गजरात सोहळ्यास सुरूवात झाली.

वारकरी वेशभूषेतील गळ्यात तुलसी माळ घातलेले विद्यार्थी, नववारी साड़ी नेसलेल्या व डोक्यावर तुलसी वृंदावन घेतलेल्या विद्यार्थिनी जागोजागी फुगडी खेळत,नाचत, भजन गात अतिशय शिस्तबद्धरित्या श्री विठ्ठल रखुमाई पालखी दिंडी सोहळ्याचा अनुभव घेत आनंद लुटला. यावेळी गावातील असंख्य माताभगिनी, ग्रामस्थ,पालक व आज आठवडा बाजाराचा दिवस असल्याने उपस्थित पंचक्रोशीतील नागरिक, व्यापारी अत्यंत कौतुकाने या सोहळ्याकडे पहात होते. हा पालखी-दिंडी उत्सव यशस्वी करण्याकरिता प्रशालेचे कलाशिक्षक श्री.राजेंद्र यंदे, सहशिक्षक श्री.सुरेश जाधव, श्री. धनंजय जोजन,सांस्कृतिक कार्यक्रम विभाग सहाय्यिका सौ. मल्लम्मा चप्पळगाव मॅडम, सौ.स्वप्नाली जमदाडे मॅडम, सेमी इंग्रजी विभागाच्या सौ.रुपाली सुरवसे मॅडम, प्रयोगशाळा सहाय्यक श्री.स्वामीनाथ कोरे,प्रा.काशिनाथ पाटील,व विठ्ठलभक्त श्री.पांडुरंग साठे यांनी विशेष परिश्रम घेतले.

# पायाभूत सुविधा आणि परदेशी गुंतवणुकीमुळे महाराष्ट्र देशात प्रथम क्रमांकावर : मुख्यमंत्री एकनाथ शिंदे

ठाणे : पायाभूत सुविधा, परदेशी गुंतवणूक आदी कामांमुळे महाराष्ट्र हे देशात प्रथम क्रमांकावर आले आहे. राज्याच्या हितासाठी व सर्वसामान्यांच्या जीवनात चांगले दिवस यावेत यासाठी हे शासन काम करत आहे, असे प्रतिपादन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज येथे केले.मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या विविध विकास कामांचे भूमिपूजन व लोकार्पण सोहळा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते पार पडला. खासदार राजेंद्र गावित, आमदार प्रताप सरनाईक, आमदार गीता जैन, आमदार भरत गोगावले, बालयोगी सदानंद महाराज, ठाणे जिल्हाधिकारी अशोक शिनगारे, मिरा भाईंदर महापालिका आयुक्त दिलीप ढोले आदी उपस्थित होते.

यावेळी मिरा रोड (पू.) येथील आरक्षण क्र. २४८ येथील सद्गुरू सदानंद महाराज सभागृह व कै. हरिचंद्र आमगावकर जिमनॅस्टीक सेंटर या इमारतीचे भूमिपूजन, केंद्र शासनाच्या हवेची गुणवत्ता सुधारणा निधी मधून प्राप्त विविध कामांचे लोकार्पण, आमदार निधीतील आरोग्य तपासणी व्हॅनचे लोकार्पण, मिरा भाईंदर शहरातील महानगरपालिकेच्या निधीतील व शासनाच्या निधीतील सिमेंट क्राँक्रीट रस्त्याचे भूमिपूजन, मिरा भाईंदर महानगरपालिकेची सूर्या प्रादेशिक पाणीपुरवठा योजनेवर आधारित वाढीव मुख्य जलवाहिन्या व वितरण व्यवस्था भूमिपूजन, मिरा भाईंदर महानगरपालिकेची भुयारी गटार योजना टप्पा- २ (भाग-१), नगर विकास विभागाकडील मुलभूत सोई सुविधांचा विकास या योजनेतील विविध कामांचे भूमिपूजन, भाईंदर (पूर्व) इंद्रलोक आरक्षण क्र. ११५ मधील शाळा इमारतीचे लोकार्पण. काशिमिरा येथील प्रभाग समिती क्र.०६ साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे इमारतीचे लोकार्पण. भाईंदर (प.) रेल्वे स्टेशन प्रवेशद्वार लोकार्पण. किल्ले घोडबंदर प्रवेशद्वार लोकार्पण, माणिकपुर पोलीस ठाणे नूतन इमारतीचे लोकार्पण आदी कामांचे आज लोकार्पण व भूमिपूजन झाले. यावेळी राज्य शासनाच्या वर्षपूर्तीनिमित्त काढण्यात आलेल्या गाण्याचे मुख्यमंत्री महोदयांच्या हस्ते लोकार्पण करण्यात आले. तसेच महिला बचतगटांना विविध व्यावसायिक साहित्याचे वाटपही मुख्यमंत्री महोदयांच्या हस्ते झाले.




मिरा भाईंदर महापालिकेच्या कामांसाठी निधी कमी पडू देणार नाही. मुख्यमंत्री श्री. शिंदे म्हणाले की, मिरा भाईंदर हे शहर मुंबई व ठाणे शहराच्या बरोबरीने पुढे यायला हवे. यासाठी येथे मोठ्या प्रमाणात विकास कामे सुरू आहेत. या शहराच्या विकासासाठी निधी कमी पडू देणार नाही. नगरविकास विभागाच्या माध्यमातून निधी देण्यात येईल. भाईंदर ते दहिसर लिंक रोडचे काम हाती घेणार आहे, त्यामुळे येथील नागरिकांचा टोलचा प्रश्न मिटेल. तसेच मुंबई सागरी किनारा मार्गही विरार ते थेट पालघर पर्यंत नेण्यात येणार आहे. तसेच बांद्रा - वर्सोवा आता विरार पर्यंत आणणार आहे. तसेच मेट्रोच्या जाळ्यामुळे वाहतूक कोंडी दूर होण्यास मदत होणार आहे.

राज्य शासनाने शेतकऱ्यांना एक रुपयात विमा देण्याचा निर्णय घेतला आहे. तसेच महात्मा जोतिबा फुले जन आरोग्य योजनेची मर्यादा आता पाच लाख केली असून राज्यातील साडेबारा कोटी जनतेला त्याचा लाभ देण्यात येणार आहे. मुलींसाठी लेक लाडकी लखपती योजनेतून मुलींच्या बँक खात्यात निधी देण्यात येणार आहे. गेल्या वर्षभरात यासह अनेक निर्णय हे सर्वसामान्यांच्या हितासाठी घेतले असल्याचे मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी यावेळी सांगितले. यावेळी आमदार श्री. सरनाईक व आमदार श्रीमती जैन यांनीही मनोगत व्यक्त केले. आयुक्त श्री. ढोले यांनी प्रास्ताविकात विकास कामांची माहिती दिली.

# अभिजीत गायकवाड यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित गुणवंत विद्यार्थी गौरव



सोलापूर/प्रतिनिधीः असोसिएशन ऑफ जीत कुने दो मार्शल आर्ट स्पोर्ट्स सोलापूर चे जनरल सेक्रेटरी अभिजीत सिद्धार्थ गायकवाड यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित गुणवंत विद्यार्थी गौरव व सत्कार करण्यात आले

माशाळे नगर कराटे क्लास विजापूर रोड येथे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते त्यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून महाराष्ट्र राज्य प्रमुख युवराज गायकवाड , किशोर चंदनशिवे , वसुंधरा कला महाविद्यालय चे शिक्षक घंटावाड व जागृती विद्या मंदिर चे प्राध्यापक सगेल तसेच ज्ञान प्रबोधिन विद्यालय सुनील बिराजदार असोसिएशनचे जिल्हा अध्यक्ष शिवशंकर घाटे, मास्टर सम्राट गायकवाड, नागेश कांबळे विश्वजीत गायकवाड आदी मान्यवर परिसरातील जेष्ठ नागरिक ,पालक, विद्यार्थी, मोठ्या संख्येने उपस्थित होते

त्यावेळी शैक्षणिक वर्ष २०२२-२३ १० वी १२ वी विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते विशेष गुणवंत विद्यार्थी पुरस्कार देऊन गौरविण्यात आले व सर्व मान्यवरांनी मार्गदर्शन केले तसेच या गुणवंत विद्यार्थ्यांना ३ महिने मोफत कराटे प्रशिक्षण देण्याची घोषणा संयोजक अभिजीत गायकवाड यांनी केले

# स्वेरीच्या वैष्णवी अभंगराव यांची 'क्रीती टेक्नोलॉजीज' कंपनीत निवड

पंढरपूर/प्रतिनिधीः 'क्रीती टेक्नोलॉजीज' या बहुराष्ट्रीय कंपनीने घेतलेल्या मुलाखतीत गोपाळपूर (ता. पंढरपूर) येथील श्री विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिटयूट संचलित अभियांत्रिकी महाविद्यालयातील वैष्णवी मिलिंद अभंगराव यांची कॅम्पस मधून निवड करण्यात आली आहे.' अशी माहिती संस्थेचे संस्थापक सचिव व अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.बी.पी. रोंगे यांनी दिली. आय.टी. क्षेत्राशी संबंधीत कोलकाता येथील 'क्रीती टेक्नोलॉजीज'या बहुराष्ट्रीय कंपनीच्या समितीने निवड प्रक्रियेच्या अंतिम फेरीतून स्वेरीच्या वैष्णवी मिलिंद अभंगराव या विद्यार्थिनीची निवड केली असून त्यांना वार्षिक रु. ६.३ लाख इतके पॅकेज मिळाले आहे. विद्यार्थ्यांचे परिश्रम, शिक्षकांचे प्रयत्न आणि स्वेरीतील शैक्षणिक कल्चर यामुळेच स्वेरीतील विद्यार्थ्यांना अधिक प्रमाणात नोकरीच्या संधी उपलब्ध होत आहेत आणि त्यातून स्वेरीवर असलेला पालकांचा विश्वास आणखी दृढ होत आहे. स्वेरी अभियांत्रिकीमध्ये विविध राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय कंपन्या प्लेसमेंट साठी येत असतात आणि कंपनीसाठी पात्र अशा विद्यार्थ्यांची निवड करत असतात. त्यामुळे विविध आंतरराष्ट्रीय कंपन्यांमध्ये येथील विद्यार्थी आपले उत्तम करिअर घडवीत आहेत. या विद्यार्थ्यांना स्वेरी मध्ये विविध प्रकारचे प्रशिक्षण दिले जाते. त्यामध्ये अॅप्टिटच्यूड,



SVERI



कम्युनिकेशन स्किल, एडवॉन्स टेक्निकल ट्रेनिंग, मॉक इंटरव्यूव, ग्रुप डिस्कशन, सॉफ्टवेअर ट्रेनींग या व्यतिरिक्त जागतिक स्तरावर संधी मिळण्यासाठी जापनीज लैंग्वेज ट्रेनींग तसेच जीआरई, टोफेल या संदर्भात मार्गदर्शन केले जाते. सदर विद्यार्थ्यांना ट्रेनिंग अँड प्लेसमेंट विभागातील तज्ञ प्राध्यापकांचे व विभागातील प्राध्यापकांचे मार्गदर्शन लाभले. शिक्षण पूर्ण होण्यापूर्वीच विद्यार्थ्यांना नोकरीची संधी उपलब्ध होत असल्याने विशेषतः पालक वर्गात आनंदाचे वातावरण पसरले आहे. संस्थेचे संस्थापक सचिव व प्राचार्य डॉ.बी.पी. रोंगे, संस्थेचे अध्यक्ष दादासाहेब रोंगे, उपाध्यक्ष हनीफ शेख तसेच संस्थेचे विश्वस्त व पदाधिकारी, स्वेरी कॅम्पस इन्चार्ज डॉ. एम.एम. पवार, स्वेरी अंतर्गत असलेल्या इतर महाविद्यालयांचे प्राचार्य, अधिष्ठाता, विभागप्रमुख, प्राध्यापक वर्ग, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी यांच्यासह पालकांनी कॅम्पस इंटरव्युवमधून निवड झालेल्या वैष्णवी अभंगराव यांचे अभिनंदन केले.



# नळदुर्ग येते डॉक्टर डे निमित्ताने डॉक्टरांचा सत्कार

वागदरी/एस.के.गायकवाड : जनहित सामाजिक संस्था व बु.जनार्धन रणे प्रतिष्ठान नळदुर्ग ता.तुळजापूरच्या वतीने दि.१जुलै २०२३ रोजी डॉक्टर डे निमित्ताने येथील शासकीय दवाखान्यातील डॉक्टरांचा व आरोग्य कर्मचारी यांचा सत्कार करण्यात आला. जनहित सामाजिक संस्था व बु.जनार्धन रणे प्रतिष्ठान नळदुर्गचे अध्यक्ष विश्वास रणे व मित्र परीवार यांच्या वतीने,डॉक्टर डे निमित्ताने उपजिल्हा रूग्णालय नळदुर्ग येथिल डाक्टर्स , स्टाफ नर्स , शिपाई मामा यांचा श्रीफळ व गुलाबफुल देऊन यथोचित सत्कार करून डाक्टर डे दिन साजरा करण्यात आला.याप्रसंगी उपस्थितीतानी सर्व डाक्टर्स,नर्स व कर्मचारी यांच्या कार्याचे कौतुक केले.यावेळी जनहित सामाजिक संस्थे चे अध्यक्ष विश्वास रणे ,सुनिल भांगे , अमर कांबळे, देवा कांबळे , बबलु जाधव ,विशाल कांबळे, नामा यादव , शंकर वडार ,रामा झेंडारे, नागु कांबळे ,दिलीप भांगे आदि उपस्थित होते



# केंद्रीय जीएसटी, मुंबई (पूर्व)चे उपायुक्त अजिंक्य काटकर यांचा विशेष सेवेबद्दल गौरव




सैनिक टाकळी/संजय चव्हाण : सैनिक टाकळी चे सुपुत्र व भारतीय महसूल सेवेतील अधिकारी अजिंक्य काटकर , उपायुक्त, केंद्रीय जीएसटी मुंबई (पूर्व) आयुक्तालय यांना केंद्रीय अप्रत्यक्ष कर व सीमाशुल्क मंडळ , नवी दिल्ली यांनी विशेष सेवेबद्दल गौरव पुरस्कार जाहीर झाला होता. १ जुलै रोजी सहाव्या जीएसटी दिनाच्या निमित्ताने विज्ञान भवन, नवी दिल्ली येथे झालेल्या विशेष कार्यक्रमात त्यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला . २०१७ च्या भारतीय महसूल सेवेचे अधिकारी असलेले अजिंक्य काटकर यांनी यापूर्वी कर्नाटकातील बेळगाव येथे काम केले आहे. त्यावेळी त्यांनी सुपारी व्यवसायातील जीएसटी कर चोरी मोठ्या प्रमाणावर उघडकीस आणुन शासनास मोठा महसूल मिळवून दिला. गेले एक वर्ष ते मुंबई पूर्व आयुक्तालयात उपायुक्त म्हणून काम करत आहे. त्यांच्या आतापर्यंतच्या कामाची दखल घेऊन केंद्र शासनाने गौरव केला आहे.अजिंक्य काटकर यांचे शिक्षण सांगलीत सिटी हायस्कूल, वालचंद कॉलेज येथे झाले आहे.त्यांचे वडिल, कै. गोपाळ (हरी) काटकर हे सांगली मध्ये प्राध्यापक होते. त्यांचे मुळ गाव सैनिक टाकळी हे आहे.

# शिक्षणासाठी आवश्यक असलेले कागदपत्रे ऑफलाईन पद्धतीने स्वीकारण्यात यावे: ओम्बासे



कळंब/प्रतिनिधी : उस्मानाबाद जिल्ह्यातील विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी आवश्यक असलेले दाखले व प्रमाणपत्र दि.१५ जुलै २०२३ रोजी पर्यंत ऑफलाइन पद्धतीने स्वीकारण्यात यावेत तसेच सदर दाखले व प्रमाणपत्र ऑनलाइन पद्धतीने निर्गत करण्यात यावेत.

तसेच विद्यार्थ्यांना विविध दाखले व प्रमाणपत्र मिळण्यास विलंब होणार नाही याची दक्षता घेण्यात यावी अशा सूचना जिल्हाधिकारी डॉ. सचिन ओम्बासे यांनी केले आहेत.सर्व्हर डाऊन असल्यामुळे तसेच तांत्रिक अडचणीमुळे चालू शैक्षणिक वर्षात विद्यार्थ्यांना विविध दाखले तसेच प्रमाणपत्र ऑनलाइन पद्धतीने सादर करण्यास विलंब व अडचण निर्माण होत आहे.त्यामुळे विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी आवश्यक असलेले विविध दाखले व प्रमाणपत्र दिनांक १५ जुलै २०२३ रोजी पर्यंत ऑफलाइन पद्धतीने स्वीकारण्याबाबत आणि ऑफलाईन पद्धतीने निर्गमित करण्याबाबत अप्पर मुख्य सचिव महसूल व वनविभाग महाराष्ट्र राज्य यांनी सुचित केले आहे.

# गुरूंच्या शिवाय आयुष्यात व्यक्ती पुढे जाऊ शकत नाही

टाकळीवाडी/प्रतिनिधीः टाकळीवाडी तालुका शिरोळ येथील श्री नामदेव निर्मळे यांची गुरूंच्या बद्दल आलेला अनुभव गुरूंचे महत्त्व आयुष्यामध्ये फार महत्त्वाचे आहे. आई ,वडील, बहीण, हे आयुष्याचे फाउंडेशन आहेत.

गुरूंचे महत्त्व काय असते.हे मी स्वतः अनुभवलेला आहे. माझी व माझ्या मुलींची नाकाला जीभ लावण्याची कला होती. १३ एप्रिल २०१३ रोजी पुढारी वर्तमानपत्रातील विश्वसंचार मध्ये एक बातमी आली होती. दिल्लीचे एक ग्रस्त एका मिनिटांमध्ये शंभर वेळा नाकाला जीभ लावून विश्व विक्रम करत आहेत.

या बातमीमुळेच आमच्या आयुष्यामध्ये बदल घडला. नाकाला जीभ लावणे ही कला आहे.व यातून एक रेकॉर्ड होऊ शकते हे समजले. पुढारी मीडिया ग्रुप चेअरमन मा.डॉक्टर योगेश जाधव साहेब यांच्यामुळे तसेच, श्री गुरुदत्त शुगर लिमिटेड टाकळीवाडी चे एक्झिक्युटेड डायरेक्टर मा. राहुल दादा घाटगे साहेब यांनी आमच्या कलेची स्पॉन्सरशिप घेतली.तसेच माझे गुरु मा.अनिरुद्ध शेपुगडे दादा यांच्या मार्गदर्शनामुळे आम्ही रेकॉर्ड करू शकलो.

कोल्हापूर जिल्हाधिकारी मा.राहुल रेखावार साहेब यांनी स्वतः बोलून मुलींना अभिनंदन पत्र दिले.

शिरोळ तालुका कर्तव्यदक्ष तहसीलदार मा.सौ.अपर्णा मोरे धुमाळ मॅडम यांनी मुलींचे कौतुक करून त्यांना अभिनंदन पत्र दिले. पारनेर अहमदनगर जिल्ह्याचे लोकप्रिय आमदार मा. निलेश लंके साहेब आणि मुलींच्या कलेची दखल घेऊन त्यांना अभिनंदन पत्र दिले. सौ माजी सभापती जिल्हा परिषद कोल्हापूर सौ.स्वाती सासणे मॅडम यांचे सुद्धा मोलाचे योगदान लाभले.

माजी पंचायत समिती सभापती शिरोळ मा. सौ. रुपाली परीट यांचे मोलाचे योगदान लाभले. माजी सैनिक दादा खोत, मा.जयपाल काणे यांचे वारंवार मार्गदर्शन आम्हाला लाभत असते. माझे वडील पुंडलिक निर्मळे, आई मंगल निर्मळे ,बहिण कविता निर्मळे यांचे आयुष्यात फार महत्व आहे. गुरु चे महत्व काय असते. गुरु विना कोणी दाखवील वाट ही मन सत्य आहे. गुरूंच्या शिवाय आयुष्यात आपण पुढे जाऊ शकत नाही हा आलेला अनुभव आहे.

# जळकोट येथे मुख्यमंत्री वैद्यकिय सहयात्ता कक्षाचे अधिकारी मंगेश चिवटे यांचा सत्कार

वागदरी/एस.के.गायकवाड : तुळजापूर तालुक्यातील जळकोट येथे गणेशदादा मित्रमंडळाच्या वतीने मंत्रालयीन मुख्यमंत्री वैदयकीय सहयात्ता कक्षाचे प्रमुख आधिकारी मंगेश चिवटे यांचा जळकोट येथे गणेश सोनटक्के व माहात्मा गांधी तंटा मुक्त समीतीचे अध्यक्ष यशवंत कदम यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

मंगेश चिवटे हे उमरगा लोहारा तालुक्याचे आमदार ज्ञानराज चौगुले यानी आयोजीत केलेल्या ज्ञान ज्योती सामाजिक संस्थेच्या पुरस्कार वितरण कार्यक्रमासाठी उमरगा येथे जात असताना भाजपा नेते गणेश सोनटक्के यांच्या निवासस्थानी त्यांचा सत्कार करण्यात आला.



यावेळी जळकोटचे माजी सरपंच तमाणाप्पा माळगे उपसंरपंच बंकट बेडगे संजय अंगुले बाळासाहेब पाटील अर्जुन यादगौडा विरभद्र पिसे अप्पू किलजे कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक अँड.अशिष सोनटक्के रिपाइंचे अरविंद लोखंडे सुनिल माळगे अरुण लोखंडे सह कार्यकर्ते उपस्थित होते